RNI No. MAHBIL /2009/31745

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग एक—मध्य उप-विभाग

वर्ष ७, अंक ४२]　　गुरुवार, ऑक्टोबर १४, २०२१/आश्विन २२, शके १९४३　　[ पृष्ठे ३, किंमत : रुपये ४.००

## असाधारण क्रमांक ६७

## प्राधिकृत प्रकाशन

**विशेष कार्यकारी अधिकारी यांच्या नेमणुका**

**अपर जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर**

**अधिसूचना**

**शासन निर्णय क्रमांक :—**

(१) शासन निर्णय क्रमांक विकाअ/११५/प्र.क्र./८८/५, दिनांक ३१/१२/२०१५.

(२) इकडील आदेश क्रमांक कार्यसन क्र./७/गृह १/आरआर/१५६१/२१, दिनांक २७/०९/२०२१.

मी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर जिल्हा, या शासन निर्णयाद्वारे सोबत जोडलेल्या नावाच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तींची कोल्हापूर जिल्ह्याचे विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे. ही नियुक्ती सामान्यतः हा निर्णय निर्गमित केल्याच्या तारखेपासून ५ वर्षांपर्यंत अस्तित्वात राहील. तसेच राज्य शासन विशेष कार्यकारी अधिकारी यांची ही नियुक्ती वरील कालावधी पूर्ण होण्यापूर्वी केव्हाही, कोणतेही कारण न देता संपुष्टात आणण्याचा मला अधिकार राहील.

१. **विशेष कार्यकारी अधिकारी पुढे उल्लेख केलेली कर्तव्ये पार पाडण्यास सक्षम राहतील :—**

(एक) या शासन निर्णयाद्वारे केलेल्या विशेष कार्यकारी अधिकारी यांच्या नियुक्त्या " **मानसेवी** " असून त्यांना सोपविण्यात आलेल्या वरील कामांबाबत कोणतेही मानधन, वेतन किंवा भत्ते अनुज्ञेय राहणार नाही.

(दोन) **साक्षांकनाचे काम** :— विशेष कार्यकारी अधिकारी यांना केवळ कागदपत्रांच्या साक्षांकनाचे अधिकार राहतील व त्यांनी मुळ कागदपत्रे प्रत्यक्ष पाहिल्या शिवाय साक्षांकन करू नये. साक्षांकन करताना विहीत रबरी शिक्क्यासह सही करून सही खाली दिनांक नमूद करावा. मूळ कागदपत्रांपेक्षा वेगळी माहिती नमूद असलेल्या कागदपत्रांवर विशेष कार्यकारी अधिकारी यांनी साक्षांकन करू नये. वेगळी माहिती असलेल्या कागदपत्रांवर जर " **सत्यप्रत** " म्हणून साक्षांकन केल्यास त्यामुळे होणाऱ्या सर्व प्रकारच्या परिणामाकरीता " **विशेष कार्यकारी अधिकारी** " म्हणून साक्षांकन करणारी व्यक्ती जबाबदार राहील. अशी घटना उघडकीस आल्यास त्या व्यक्तीची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून करण्यात आलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल व तो/ती विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून पुर्ननियुक्तीस अपात्र असेल.

(तीन) **ओळखपरेड :—** विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या व्यक्तींनी **" ओळख परेड "** तसेच **" मृत्यूपुर्व जबानी "** **यासाठी उपस्थित राहू नये.**

(चार) **उत्पन्न प्रमाणपत्र देणे :—** विशेष कार्यकारी अधिकारी यांनी उत्पन्न प्रमाणपत्र देऊ नये.

२. विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या व्यक्तीनी त्यांच्या घरावर/दुकानावर/कार्यालयावर स्वतःच्या नावासह **" विशेष कार्यकारी अधिकारी "** असा फलक लावावा. तथापि त्यांनी त्यांच्या कुठल्याही वाहनावर **" विशेष कार्यकारी अधिकारी "** असा उल्लेख करू नये. तसेच त्यांच्या नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यावर लागलीच फलक काढावेत.

३. नियुक्ती करण्यात आलेल्या विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांना मोहोर उमटविण्यासाठी शिक्का नजिकच्या पोलीस स्टेशनकडून उपलब्ध करून घ्यावा. तसेच साक्षांकित केलेल्याची माहिती एका नोंदवहीत न चुकता नमूद करावी व ज्या वेळेस या नोंदवहीची अवलोकनासाठी संबंधित पोलीस आयुक्त/अधिक्षक/जिल्हाधिकारी यांचेकडून मागणी केली जाईल, त्यावेळी ती तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावी.

४. या शासन निर्णयाद्वारे नेमण्यात आलेल्या विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांची, शांतता प्रस्तावित करण्यासाठी आवश्यकतेनुसार त्या क्षेत्रातील मोहल्ला समिती/शांतता समितीवर पोलीस आयुक्त जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी नियुक्ती करावी.

५. नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर विशेष कार्यकारी अधिकारी यांनी साक्षांकनाचे काम करू नये व सर्व साहित्य जिल्हाधिकारी यांचेकडे तात्काळ परत करावे, अन्यथा ते पुनर्नियुक्तीस अपात्र ठरतील. नियुक्ती कालावधी संपुष्टात आल्यानंतर विशेष कार्यकारी अधिकारी यांनी साक्षांकन केल्याचे निष्पन्न झाल्यास त्यांचे विरुध्द फसवणुकीचा गुन्हा नोंदविण्यात येईल.

## अनुसूची

| अ.क्र. (१) | विशेष कार्यकारी अधिकारी पदी नियुक्त करावयाच्या व्यक्तीचे नाव (२) | वय (३) | पत्ता (४) | शिक्षण (५) |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. रघुनाथ रामचंद्र मुधाळे | ५५ | रा. हुपरी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | बी. कॉम |
| २ | श्री. सुरेश शिवाजी पोवार | ४० | रा. वेताळ पेठ, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | १० वी |
| ३ | श्री. बाबासो विष्णुपंत ढेरे | ५० | रा. ७७५, बी वार्ड, आयटीआयजवळ, कळंबा, कोल्हापूर | १० वी |
| ४ | श्री. सर्जेराव अरविंद हळदकर | ५४ | रा. मधुबन हौसिंग सोसायटी, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर. | बी. ए. |
| ५ | श्री. रावण मार्तंड समुद्रे | ५२ | रा. किणी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | १० वी |
| ६ | श्री. धनंजय भिमराव देसाई | ५० | रा. पाडळी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | १० वी |
| ७ | श्री. अनिल रामचंद्र निकम | ५३ | रा. आळते, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | १० वी |
| ८ | श्री. प्रशांत आप्पासो उपाध्ये | ४१ | रा. शाहूनगर जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर | बी. ए. |
| ९ | श्री. निलेश जयसिंग जगताप | ४७ | रा. प्लॉट नं. १४, इंगवले कॉलनी, फुलेवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर | १० वी |
| १० | श्री. शिवाजी केरबा चौगुले | ४५ | रा. वाकरे, ता. करवीर, जि. कोल्हापूर | १२ वी |
| ११ | श्री. कृष्णात गणपती सिद | ५१ | रा. जुने पारगांव, वारणानगर, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | १० वी |
| १२ | श्री. प्रविण बाळासो भिके | ४४ | रा. कुडित्रे, ता. करवीर, जि. कोल्हापूर | बी. कॉम. |
| १३ | श्री. साताप्पा महादेव सुतार | ५० | रा. यळगुड, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | बी. ए. |
| १४ | श्री. सर्जेराव आबा पाटील | ५३ | रा. पुनाळ, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर | १० वी |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १५ | श्री. अशोक बापूसो खाडे | ५२ | रा. बहिरेवाडी, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर | १० वी |
| १६ | श्री. संजय गजानन सासणे | ६१ | रा. ११०४, ए वार्ड, सरदार तालीमजवळ, शिवाजी पेठ, कोल्हापूर. | १० वी |
| १७ | श्री. प्रताप अरविंद घेवडे | ५६ | रा. दिनकर अपार्टमेंट, राजारामपूरी, ८ वी गल्ली, कोल्हापूर | १० वी |
| १८ | श्री. अवघडी बाळू सिसाळ | ६० | रा. माळवाडी, हनुमान चौक, टोप, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | १० वी |
| १९ | श्री. भगवान मायाप्पा माने | ५८ | रा. केर्ली, ता. करवीर, जि. कोल्हापूर | १० वी |

**शंकरराव जाधव,**
अपर जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.